## एमजी मोटरच्या ग्राहकांसाठी सुविधा

नवी दिल्ली - वाहन निर्मिती क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी एमजी मोटर इंडियाने आपल्या ग्राहकांसाठी मोफत ऑनलाईन वैद्यकीय समुपदेशन सुविधा केली आहे. या विशेष सुविधेच्या माध्यमातून तज्ज्ञ डॉक्टर्स कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर एमजी मोटरच्या ग्राहकांना खास मार्गदर्शन करणार आहेत. एमजी मोटर कपनीच्या ग्राहकांना तसेच त्यांच्या कुटुंबियांना तज्ज्ञ किंवा अतिशय उच्च दर्जाच्या डॉक्टरांकडून समुपदेशन मिळू शकणार आहे.

## व्यापार डायरी....

### सोने महागले, चांदी स्वस्त

**नवी दिल्ली** – आज शुक्रवारी दिल्ली सराफा बाजारात सोन्याच्या दरात ११९ रुपयांची वाढ होऊन सोन्याचे दर ४७,९९५ रुपये प्रति ग्रॅमवर पोहोचले. आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचे दर वाढल्यामुळे देशात सोन्याच्या दरात वाढ झाल्याचे एचडीएफसी सिक्युरिटीजने म्हटले आहे. याआधी सोन्याचे दर प्रति १० ग्रॅमला ४७,८७६ रुपये इतके होते. चांदीच्या दरात मात्र तब्बल २५८ रुपयांची घट झाली असून सोन्याचे दर किलोमागे ७०,९९८ रुपये इतके झाले. याआधी चांदीचे दर प्रति किलोग्रॅमला ७१,२५६ रुपये इतके होते. दरम्यान, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सोन्याचे दर प्रति पाऊंड १,८७७ डॉलर इतके होते तर चांदीचे दर प्रति पाऊंड २७.६८ इतके झाले. आठवड्यात तिसऱ्यांदा सोन्याच्या दरात इतकी वाढ झाली आहे.

### हिंदाल्कोला भरघोस नफा

**नवी दिल्ली** – हिंदाल्को इंडस्ट्रईजला करपश्चात तब्बल १,९२८ कोटी रुपयांचा नफा झाला आहे. मार्च २०२१ ला संपलेल्या तिमाहीतील नफ्याची आकडेवारी कंपनीने जाहीर केली आहे. गेल्यावर्षी कंपनीला एकूण ६६८ कोटी रुपयांचा नफा झाला होता. तर जानेवारी ते मार्च २०२१ दरम्यानच्या तमाहीत कंपनीला तब्बल ४०,५०७ कोटी रुपयांचा महसूल मिळाला असून गेल्या वर्षी हाच आकडा २९,३१८ कोटी इतका होता. कंपनीच्या चांगल्या कामगिरीच्या पार्श्वभूमीवर कंपनीच्या नफ्यात करपश्चात तब्बल १८९ टक्क्यांची वाढ होऊन तो १,९२८ कोटी रुपयांवर पोहोचल्याचे हिंदाल्को इंडस्ट्रीजने म्हटले आहे.

### झोमॅटोची मोफत लसीकरण मोहीम

**नवी दिल्ली** – ऑनलाईन फुड ऑर्डरींग प्लॅटफॉर्म झोमॅटो कंपनी आपल्या १.५ लाख फ्रंटलाईन स्टाफ आणि कर्मचाऱ्यांसाठी मोफत लसीकरण मोहीम राबवणार आहे. कपनीचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंदर गोयल यांनी याबाबतची माहिती दिली आहे. गेल्याच आठवड्यात दिल्लीत कंपनीने डिलीव्हरी पार्टनर्ससाठी लसीकरण मोहीम सुरू केली. याअंतर्गत कंपनीने दीड लाखांहून अधिक फ्रंटलाईन स्टाफ आणि कर्मचाऱ्यांसाठी लसीकरण मोहीम राबवली. हजारो डिलीव्हरी पार्टनर्स यांचे यापूर्वीच लसीकरण झाल्याचे गोयल यांनी सांगितले. ट्वीटरच्या माध्यमातून गोयल यांनी याबाबतची माहिती दिली आहे. मुंबई आणि बंगळुरू येथे उद्या शनिवारपासून लसीकरण मोहीम राबवण्यात येणार आहे तर अनेक शहरांमध्ये पुढच्या आठवड्यापासून लसीकरण मोहीम राबवण्यात येणार आहे.

# कॉर्पोरेट जगताला सर्वोच्च न्यायालयाचा दणका

**वृत्तसंस्था / नवी दिल्ली**

सर्वोच्च न्यायालयाने कॉर्पोरेट जगताला जबरदस्त दणका दिला आहे. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या कंपन्यांच्या वैयक्तिक गॅरेंटर्सविरोधात बँकांना किंवा वित्तीय संस्थांकडून करण्यात येणाऱ्या कारवाईला वैध ठरवले आहे. बँकांना किंवा वित्तीय संस्थांना आयबीसी अर्थात दिवाळखोरी कायद्यांतर्गत कारवाईसाठी सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचा फटका डीएचएफएलचे माजी प्रमोटर कपिल वाधवान आणि भुषण पावर अॅण्ट स्टीलचे माजी ओनर किंवा मालक यांना बसणार आहे.

याप्रकरणी सरकारने आयबीसी कायद्यांतर्गत बँकांना किंवा वित्तीय संस्थांना वैयक्तिक गॅरेंटर्सविरोधात कारवाई करण्यासाठी परवानगी देण्याच्या अनुषंगाने अधिसुचना जारी केली होती. १५ नोव्हेंबर २०१५ रोजी ही अधिसुचना जारी करण्यात आली होती. याप्रकरणी सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने सरकारची अधिसुचना किंवा नोटिफीकेशनची वैधता कायम ठेवली.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे दिवाळखोरी प्रक्रीयेचा सामना करणाऱ्या



दिवाळखोरी कायद्यांतर्गत कारवाईसाठी बँकांना परवानगी

कंपन्यांच्या वैयक्तिक गॅरेंटर्सविरोधात कारवाई करण्याचा बँकांचा किंवा वित्तीय संस्थांचा मार्ग मोकळा झाल्याचे कॉर्पोरेट लॉयर सुनिल बत्रा यांनी म्हटले आहे. सरकारच्या अधिसुचनेविरोधात तब्बल ७५ आव्हान याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. या याचिकांवर आज शुक्रवारी सर्वोच्च न्यायलयात सुनावणी झाली. कर्ज घेणाऱ्या कंपन्या अनेकदा वैयक्तिक गॅरेंटर्सना सुटकेसाठी अनेक मार्ग खुले ठेवतात. परंतु आज सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुले हे सर्व मार्ग बंद होणार आहेत, असेही सुनिल बत्रा यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे आता बँकांना तसेच वित्तीय संस्थांना कर्ज वसुलीचे अधिकार मिळणार असून अनेक बँकांच्या एनपीएमध्ये किंवा बुडीतकर्जांमध्येही घट होण्यास मदत होणार आहे. दरम्यान, न्यायाधिश एल. नागेश्वर राव आणि रविंद्र भट यांच्या खंडपीठाने याप्रकरणी सुनावणी केली. सरकारच्या आयबीसी नोटिफीकेशनविरोधात अनिल अंबानी, कपिल वाधवान, संजय सिंघल आणि वेणूगोपाल धूत यांच्यासारख्या बड्या उद्योजकांनी सर्वोच्च न्यायलयात आव्हान दिले होतेसर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे त्यांना चांगलाच फटका बसणार आहे. .

# मुंबईत पेट्रोलने गाठली शंभरी

**वृत्तसंस्था / नवी दिल्ली**

पेट्रोलचे दर दिवसेंदिवस नवे उच्चांक प्रस्थापित करत आहेत. आर्थिक राजधानी मुंबापुरीत पेट्रोलने शंभरी गाठली. आज शुक्रवारी मुंबईत पेट्रोलचे दर लिटरमागे ९९.३२ रुपये तर डिझेलचे दर लिटरमागे ९१.०१ रुपये इतके झाले. अशाप्रकारे सर्वसामान्य जनतेला सरकारने इंधन दरवाढीचा अक्षरशः शॉक दिला आहे

आज शुक्रवारी पेट्रोलच्या दरात लिटरमागे १९ पैशांची तर डिझेलच्या दरात २९ पैशांची वाढ करण्यात आली. या महिन्यात ही ११ वी इंधन दरवाढ आहे. या दरवाढीसह पेट्रोल आणि डिझेलने देशात दरवाढीचा उच्चांक गाठला आहे. दिल्लीत पेट्रोलचे दर लिटरमागे ९३.०४ रुपये तर डिझेलचे दर लिटरमागे ८३.८० रुपये इतके झाले. दरम्यान, अनेक शहरांमध्ये पेट्रोलच्या दराने शंभरी पार केली आहे. राजस्थान, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्रात पेट्रोलचे दर १०० च्याही पुढे गेले आहेत. तिन्ही राज्यांनी व्हॅट लागू केल्यामुळे इंधनाचे दर नवनवे उच्चांग गाठत असल्याचे समोर आले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात गेल्या १५ दिवसांपासून कच्च्या तेलाचे दर वाढत आहेत. परिणामी, देशातही इंधन दरवाढीचा भडका उडाला आहे.

४ मेपासून इंधनात सातत्याने दरवाढ होत आहे. आज ११ व्या दिवशीही पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ झाली आहे. पश्चिम बंगालसह विविध राज्यांच्या निवडणुका संपल्यानंतर पेट्रोल आणि डिझेल दरवाढ झाली आहे. राजस्थानातील श्री गंगानगर येथे देशात सर्वाधिक पेट्रोल दरवाढ झाली आहे. याठिकाणी पेट्रोलचे दर लिटरमागे १०४ रुपये तर डिझेलचे दर ९६.६२ रुपये प्रति लिटर इतके झाले आहेत. आतापर्यंत पेट्रोलच्या दरात लिटरमागे २.६४ रुपयांची तर डिझेलच्या दरात लिटरमागे ३.०७ रुपयांची वाढ झाली आहे.

## एसबीआयला ६,४५१ कोटींचा नफा

**वृत्तसंस्था / मुंबई**

एसबीआय अर्थात स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नफ्यात तब्बल ८०.१५ टक्क्यांची वाढ झाली असून कंपनीला करपश्चात तब्बल ६,४५१ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. बँकेच्या व्याजदरातुन मिळणारे भरघोस उत्पन्न आणि बुडीत कर्जांचे कमी झालेले प्रमाण यामुळे बँकेला इतक्या मोठ्या प्रमाणमावर नफा मिळाला आहे.

गेल्या वित्तीय वर्षात म्हणजेच वित्तीय वर्ष २०२० मध्ये बँकेला याच कालावधीत ३,५८१ कोटी रुपयांचा नफा झाला होता. तर संपूर्ण चालू वित्तीय वर्षात बँकेच्या नफ्यात करपश्चात तब्बल ४१ टक्क्यांची वाढ होऊन बँकेचा नफा २०,४१० कोटी रुपयांवर पोहोचला आहे. वित्तीय वर्ष २०२० मध्ये हाच आकडा १४,४८८ कोटी इतका होता. मार्च २०२१ मध्ये संपलेल्या तिमाहीत बँकेच्या उत्पन्नात १८.८९ टक्क्यांची वाढ झाली असून बँकेला एकूण २२,०६७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले असून गेल्या वर्षी हाच आकडा २२,७६७ कोटी इतका होता.

## वोल्वोचे कर्मचाऱ्यांसाठी १० लाखांचे विमा कव्हर

**वृत्तसंस्था / नवी दिल्ली**– वोल्वो कार इंडिया आपल्या कर्मचाऱ्यांसाठी १० लाख रुपयांचे विमा कव्हर देणार आहे. डीलरशिप्स असणाऱ्यांनाही हे विमा कव्हर देण्यात येणार आहे. कोरोना महामारीच्या दुसऱ्या लाटेचा प्रादुर्भाव देशभरात चांगलाच वाढला असून कोरोनाबाधितांची संख्याही वाढली आहे. कोरोनाने मृत्युमुखी पडणाऱ्यांचे प्रमाणही लक्षणीय आहे. या पार्श्वभूमीवर कंपनीने आपल्या कर्मचारी आणि डिलर्सना तब्बल १० लाख रुपयांचे विमा कव्हर देण्याचा निर्णय घेतला आहे.

## शेअर बाजारात ९७६ अंकांची उसळी

**वृत्तसंस्था / मुंबई**

गुंतवणूकदारांमध्ये सकारात्मक वातावरण असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर झालेल्या शेअर्सच्या खरेदीच्या पार्श्वभूमीवर आज मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकाने तब्बल ९७६ अंकांनी उसळी घेतली. निर्देशांकात ९७५.६२ अंकांची म्हणजेच १.९७ टक्क्यांची वाढ होऊन निर्देशांक ५०,५४०.४८ अंकांवर स्थिरावला तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २६९.२५ अंकांनी किंवा १.८१ टक्क्यांच्या वाढीसह १५,१७५.३० वर पोहोचला.

एचडीएफसी बँकेला सर्वाधिक फायदा झाला. एचडीएफसी बँकेच्या शेअर्सच्या भावात तब्बल ४ टक्क्यांची वाढ झाली. पाठोपाठ एसबीआयच्या शेअर्सच्या दरातही वाढ झाली असून बँकेने आपल्या तिमाहीतील भरघोस नफा जाहीर केल्याच्या पार्श्वभूमीवरदेखील शेअर बाजारात तेजीचे वातावरण होते. देशातील सर्वात मोठी बँक असलेल्या एसबीआयने मार्च २०२१ पर्यंत संपलेल्या चौथ्या तिमाहीत बँकेला तब्बल ६.४५०.७५ कोटी रुपयांचा नफा झाला असून बुडीत कर्जाचे प्रमाण कमी झाल्यामुळे बँकेला इतक्या मोठ्या प्रमाणावर नफा झाला आहे. त्याचाही सकारात्मक परिणाम शेअर बाजारावर दिसला.

इंडसइंड बँक, आयसीआयसीआय बँक, अॅक्सिस बँक आणि एचडीएफसी बँकेच्या शेअर्सचे भावदेखील वधारले. दुसरीकडे पावरग्रीड आणि डॉ.रेड्डीजच्या शेअर्समध्ये मात्र घसरण दिसली.

---

**RIDHI SYNTHETICS LIMITED**

Regd Office: 11-B, Mittal Tower, Free Press Journal Marg, Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel.: 022 6115 5300 • Email: ridhisyntheticsltd@gmail.com
CIN: L51900MH1981PLC025265

**NOTICE**

Notice is hereby given that, a meeting of the Board of Directors of the Company will be held on Wednesday, 2nd June, 2021 in Mumbai to consider, inter alia, Audited Financial Results for the year ended 31st March, 2021.

For Ridhi Synthetics Limited
Sd/-
Wholetime Director
Pawan Shukla
DIN: 08559774

Place : Mumbai
Date : 21.05.2021

---

**EPIC ENERGY LIMITED**

www.epicenergy.biz
AN ISO 9001:2015 COMPANY
**Regd. Office:** Office No. 1205, "AMBIENCE COURT", Sector-19E, Vashi, Navi Mumbai-400703. **Tel.:** +91-22- 8419988262
**Email:** info@epicenergy.biz,

**NOTICE**

Notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company will be held on **Saturday, 29th May, 2021**, through video conferencing inter-alia, to consider the Audited Financial Results for the quarter and year ended 31st March, 2021.

For **EPIC ENERGY LIMITED**
Sd/-
Director

Date : 20th May, 2021
Place : Navi Mumbai

---

**सार्वजनिक सूचना**

मी, **भाविन हसमुख कुबडीया,** वय 33. रा.ठी. 701,702/ सनशाईन को.ओ. सोसायटी, सुभाषलेन, मालाड पुर्व, मुंबई, या जाहीर नोटीसव्दारे **श्रीमती दर्शना किशोर बोटले** व इतर सर्वाना कळवितो की, माझे मालकीचा डी.एलमास, गाळा क्र 303, 3 रा. माळा, सोनावाला रोड,गोरेगाव पुर्व, मुंबई येथे व्यवसायईक गाळा असुन नमुद (गाळा) मालमत्ता मी महिला नामे दर्शना किशोर बोटले यांनी दोन वर्ष कालावधीकरीता दिनांक 15/11/2020 रोजी नोंदणीकृत भाडेकरारान्वये भाडयाने दिला होता. परंतु श्रीमती दर्शना बोटले यांना भाडे न देता नमुद भाडेकराराचा भंग केल्याने मी नमुद महिलेस गाळा खाली करण्याबाबत तसेच विहीत कालावधीत गाळा खाली न केल्यास प्रति दिवस दंडाची आकारणी करण्यात येईल या बाबत दिनांक 18/03/2021 रोजी नोटीस अदा केली असुन सदरची नोटीस श्रीमती दर्शना बोटले यांनी दिनांक 19/03/2021 रोजी स्विकारलेली आहे. सदर नोटीसचा कालावधी हा दिनांक 17/04/2021 रोजी संपुष्टात आला असुन नमुद दर्शना बोटले यांचेविरुध्द वनराई पुलिस ठाणेस गुन्हा नोंद असुन त्यांनी आजपर्यंत गाळा खाली केलेला नाही. सदरची मालमत्ता हि माझे मालकीची असल्याने सदरची मालमत्ता श्रीमती दर्शना बोटले यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासुन 7 दिवसाचे कालावधीत सदरची मालमत्ता माझे ताब्यात न दिल्यास सदरची मालमत्ता मी माझे ताब्यात घेईन. त्यांनतर मी कोणालाही कोणतेही देणे राहणार नाही याची श्रीमती दर्शना बोटले यांनी व इतर सर्वानी नोंद घ्यावी.

**दिनांक 22 मई 2021** **भाविन हसमुख कुबडीया**

---

## नाशिक महानगरपालिका, नाशिक

**१ ला मजला, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक - ४२२००२**

**कार्यशाळा व्यवस्थापन विभाग**

**ई-निविदा सुचना क्र. ४/२०२१-२२ (फेर निविदा)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि "ड" प्रकरण ५ संविदा (२) (१) अन्वये नाशिक महानगर पालिका खालील कामाकरीता ऑनलाईन पध्दतीने निविदा मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | प्राकलन र. रु. | निविदा बयाणा रक्कम रु. | निविदा शुल्क रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १. | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२०-२१ नाशिक पंचवटी विभागासाठी १ शव वाहिका (वैकुंठ रथ) खरेदी करणे बाबात. | १३,९६,६११/- | १४,०००/- | रु. ५०० + ९० + ९० (१८% जी.एस.टी) |
| २. | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२०-२१ नाशिक रोड, नाशिक विभागासाठी १ शव वाहिका (वैकुंठ रथ) खरेदी करणे बाबात. | १३,९६,६११/- | १४,०००/- | रु. ५०० + ९० + ९० (१८% जी.एस.टी) |

१. सदर कामाची विस्तृत ई- निविदा व अनुषंगीक माहिती महाराष्ट्र शासनाच्या **https://mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
२. निविदा विक्री व स्विकृती **दि. २२/०५/२०२१ ते ३१/०५/२०२१ दुपारी १५.००** वाजेपर्यंत.
३. ऑनलाईन सादर केलेल्या तांत्रिक निविदा शक्य झाल्यास **दि. ०१.०६.२०२१ रोजी सायं १७.००** वाजेनंतर उघडण्यात येतील.
४. कोणत्याही प्रकारचे ऑनलाईन देकार स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार, आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे रहातील.

सही/-
कार्यकारी अभियंता (यां.)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

ज.सं./जा.क्र./८१/दि. २१/०५/२०२१
कोरोनाची थांबवा साथ, वारंवार धुवा आपले हात

---

**PUBLIC NOTICE**

**TAKE NOTICE THAT** our client, **MR. RUTESH ARUN KALE** is the owner of Flat No. A-2/2, Building No. A2 on the Ground Floor of Shri Punit Nagar (Plot No. 3) Co-operative Housing Society Limited, situated at Plot bearing C.T.S. No. 12, 13 and 21 of Village Magathane Taluka Borivali lying and being at S. V. Road, Borivali West, Mumbai-400092 (hereinafter referred to as the "said flat") and a member of Shri Punit Nagar (Plot No. 3) Co-operative Housing Society Ltd. (hereinafter referred to as the "said society") and holding 5 (Five) fully paid bearing Distinctive Nos. 196 to 200 (both inclusive) under Share Certificate No. 40.

**TAKE NOTICE THAT** our client has misplaced (i) the Original Agreement dated 22nd July 1978, whereby one Smt Sunanda Dhondiram Nawathe originally purchased the said Flat from M/s Gokul Construction Co. (Builders) and (ii) Agreement for Sale dated 31st August 1991 whereby the said Flat was sold by Smt. Sunanda Dhondiram Nawathe to (1) Mr. Shashikant R. Barot, (2) Mrs. Nassem Shashikant Barot and (3) Miss Suryabala R. Barot and has also lodged a police complaint for the aforesaid misplaced Agreement with Borivali Police Station under Missing No. 1417 of 2021 dated 21.05.2021.

The general public through this public notice is cautioned not to deal with any person/s in respect of the aforesaid misplaced Agreements concerning the said flat.

MUMBAI :
THIS 22nd DAY OF MAY, 2021.

Sd./-
SHILPA NAGORI,
Advocate and Solicitor, SN LEGAL
19D, B-Wing, White Spring, Rivali Park,
W. E. Highway, Near Metro Mall,Borivali (E),
Mumbai - 400066
Phone : +91 22 49697771 / +91 9769760940

---

## नवकार कॉर्पोरेशन लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय : २०५-२०६, जे.के. चेंबर्स, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई ४००७०३, महाराष्ट्र, इंडिया**
**सीआयएन: -एल६३०००एमएच२००८पीएलसी१८७१४६**

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन २९ सहवाचता रेग्युलेशन ४७ ला अनुसरुन कंपनीच्या संचालक मंडळाची सभा मार्च ३१, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही आणि वित्तीय वर्षाकरिता कंपनीचे लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह विचारात आणि मंजूर करण्यासाठी शुक्रवार, मे २८, २०२१ रोजी घेण्यात येणार आहे. सदर सूचना ही कंपनीची वेबसाईट www.navkarcfs.com येथे आणि स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईट www.bseindia.com आणि www.nseindia.com यावर उपलब्ध आहे.

**नवकार कॉर्पोरेशन लिमिटेड** करिता
सही/-
दीपा गेहानी
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

**ठिकाण:** नवी मुंबई
**दिनांक:** मे २१, २०२१

---

**गरवारे क्लब हाऊस**

(कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २५ अन्वये स्थापित कंपनी)
नोंदणी कार्यालयः वानखेडे स्टेडियम, 'डी' रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.
सीआयएनः यु९२१००एमएच१९९३एनपीएल०७१४८८
दूर. (कार्या.): (०२२) ४३३२ ३३ ३३/००
ईमेलः info@garwareclub.co.in वेबसाईटः www.garwareclub.co.in

**क्लब हाऊसची पहिली विशेष साधारण सभा पुढे ढकलण्याची सूचना**

सूचना याद्वारे देण्यात येते की, वित्तीय वर्ष २०२१-२०२२ करिता गरवारे क्लब हाऊसच्या सभासदांची पहिली विशेष सर्वसाधारण सभा (ईओजीएम) जी मुद्दा क्र. १ अंतर्गत विशेष कामकाज करण्यासाठी दिनांक ३० एप्रिल, २०२१ रोजीच्या सूचनेद्वारे सोमवार, ३१ मे, २०२१ रोजी सायं. ५.३० वा. घेण्याचे नियोजित होते की कोविड-१९ महामारीच्या उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकार आणि बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या आयुक्तांनी घोषित केलेल्या लॉकडाऊन मुळे **पुढे ढकलण्यात** आली आहे.

मॅनेजिंग कमिटीच्या वतीने आणि करिता
सही/-
**(राज के. पुरोहित)**
व्हाईस-प्रेसिडंट
डीआयएनः ०१४०८५८९

ठिकाणः मुंबई
दिनांक : २० मे, २०२१

---

**जाहीर सूचना**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार नामे **१) श्री. पांडुरंग लक्ष्मण भंडारी आणि २) सौ रोहिणी पांडुरंग भंडारी** दोन्ही राहाणार- सखी व्हिला शिंपोली गाव, बोरीवली (प.) मुबई ४०००९२. यांनी दिलेल्या अधिकारावरून मी ही जाहिर नोटीस देतो की,

आमचा मुलगा श्री नितिन पांडुरंग भंडारी वय ४८ वर्षे गैरजबाबदारपणामुळे व गैरवागर्नुकीमुळे तो सन २००९ पासून आमचे पासून विभक्त रहात आहे. तेव्हा पासून त्याचेशी आमचे कोणतेही संबंध ठेवलेले नाहीत. असे असताना त्याने आमचे अपरोक्ष ओळखी अनोळखी व्यक्ती किंवा संस्था याचेकडून पैसे कर्जाने घेतलेले आहेत. किंवा त्यांनी स्वत: केलेल्या कृती मुळे सदरील लोक हे पैशाचे व्यवहाराचे संबंधी आम्हास विचारणा करत असतात मात्र माझे पक्षकार यांनी त्यास २००९ पासून स्वत:च्या मिळकतीच्या मालमत्तेतून बेदखल केलेले आहे व त्याचे व्यवहाराशी माझे पक्षकार यांचा कोणताही दुरान्वये संबंध नाही. व त्यास माझे पक्षकार यांनी बेदखल केलेले आहे.

तरी आपण सर्वांना या जाहिर नोटीसीने सूचित करण्यात येते की, नितीन पांडुरंग भंडारी यांनी माझे पक्षकार यांचे अपरोक्ष केलेले कोणतेही व्यवहाराशी माझे पक्षकार हे बांधील नाहीत व त्यामुळे माझे पक्षकाराशी कोणीही त्याचे या मुलाचे संबंधी संपर्क करू नये हे आपणासर्वांना सुचित व्हावे करीता ही जाहिर नोटीस दिली असे.

**सही/- आनंद बी. बागुल**
**एडवोकेट हाई कोर्ट**
**बागुल निवास रूम. नं १, तेजुमल चक्की रोड, उल्हासनगर - ४२१००१,**
**जिल्हा: ठाणे**

स्थळ : मुंबई दिनांक: २२/०५/२०२१

---

## वसई विकास सहकारी बँक लि. वसई. (शेडयुल्ड बँक)

**वसुली अधिकारी**

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये)
मुख्यकार्यालय, चिमाजी आप्पा मैदानासमोर, वसई गाव एस.टी.स्टँड जवळ, वसई रोड (प), पालघर. ४०१२०१. दुरध्वनी क्रं.०२५० - २३२६९८४/२३२६९९८, मो.९०११०५५३८४

**जाहीर लिलाव**

वसुली अधिकारी व्दारे सर्व जनता आणि विशेषतः खालील नमुद कर्जदार व सदर कर्जास जामिन असलेल्या जामिनदारांना सुचना देण्यात येत आहे की, महाराष्ट्र सहाकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदी अंतर्गत मा. उप निबंधक, सहकारी संस्था, वसई यांनी दिलेल्या वसुली प्रमाणपत्रांच्या अंमलबजावणी दरम्यान वसई विकास सहकारी बॅंक ली कडे तारण असलेल्या खालील नमुद जंगम मालमत्तेची, थकवाकीदार देय रक्कम व त्यावरील व्याज इतर खर्च व शासकीय अधिभार अशी एकुण रक्कम, संवंधीत कर्जखात्यांची देय रक्कम वसुल करण्याकरिता जप्त मालमत्तेचा जाहिर लिलाव दिलेल्या तारखेस "जसे आहे, जेथे आहे व जे आहे" या तत्वावर करण्यात येणार आहे.

- **कर्जदाराचे नाव व कर्जखाते : मे. जोबन फॅशन प्रा. लि. (CC/383)**
- वसुली दाखला व रक्कम : कं ३३३/२०२० रक्कम ३,३१,८६,०९२/- दि. २५/०६/२०२०
- **लिलावास काढण्यात आलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन :**
  इंडस्टीयल गाला कं. २०६ दूसरा मजला, "टॉप कलास इनकलेव.", भोयदा पाडा, सातीवली रोड, गाव मौजे गोखीवरे, वसई (पू.), ता. वसई, जि. पालघर. मध्ये जप्त करुन ठेवलेला तयार कपडयाचा साठा व कपडयाचे तागे.
- **वाजवी रक्कम :** रू ४,००,०००/-
- अनामत रक्कम : रू ६०,०००/-
- **लिलावाचे स्थळ लिलाव तारीख व वेळ**
  वसई विकास सहकारी बॅंक लि. मुख्यकार्यालय, चिमाजी आप्पा मैदानासमोर, वसई गाव एस.टी. स्टॅंड जवळ, वसई रोड (प), पालघर. ४०१२०१. येथे दि ३१ मे २०२१ रोजी दु.१२.०० वाजता.
- **लिलावास काढण्यात आलेल्या जंगम मालमत्तेवरील इतर भार :** आजतगायत आढळले नाहीत. सदर मालमत्ता **"जसे आहे, जेथे आहे व जे आहे"** या तत्वावर व बॅंकेला ज्ञात व अज्ञात सर्व विदयमान आणि भविष्यातील बोज्यासहीत विकण्यास येणार आहे.

मालमत्तेचे लिलावासंदर्भात अटी व शर्ती असणारे बोलीपत्र निम्म स्वाक्षरीकार यांच्या कार्यालयात दि. २४.०५.२०२१ ते २८.०५.२०२१ रोजी रू.१०००/- रोख रक्कम (विना परतावा) भरून प्राप्त होऊ शकेल. लिलावातील बोलीपत्रासोबत के.वाय.सी. कागदपत्रे व नमुद केलेली अनामत रक्कम दि २९.०५.२०२१ दु. १२.०० वाजेपर्यंत जमा करणे आवश्यक आहे. कोणतेही कारण न दर्शविता, निविदा किंवा बोली स्विकारणे किंवा नाकारणे किंवा लिलाव स्थगित/निंलबित/रदद् करण्याचा अधिकार, तसेच कोणत्याही पुर्व सुचनेशिवाय, विकीचे कोणतेही नियम व अटी बदल करण्याचा अधिकार निम्म स्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या अगर मिळकत मालक, कर्जदार वा इतर यांचे मिळकतीवावत कोणाची, कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास तसेच सदरची मिळकत कोणाकडे गहाण, दान, लीन सवलीज वक्षीसपत्र, मुखत्यारपत्र, करार, इत्यादी कारणाने वोजा असल्यास अगर कोणाचा काही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत आमचे कार्यालयात योग्य त्या लेखी पुराव्यासह हरकती नोंदवव्यात. मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार न आल्यास सदरची मिळकत निर्वेध समजुन विकी केली जाईल. परस्पर वर्त मानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. नोटीस हरकत मुदतीनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**वसुली अधिकारी**
**म.स.का.१९६० कलम १५६ अन्वये.**

**स्थळ:- वसई**

---

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**अभिव्यक्ती स्वारस्य (ई.ओ.आय.) क्र. ०५/२०२१-२०२२**

आरोग्य मुख्यालय, कल्याण मार्फत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकरिता कोविड लस पुरवठा करण्याकरिता उत्पादक/ख्यातनाम वितरक/पुरवठाधारक/संस्था यांच्याकडून अभिव्यक्ती स्वारस्य (ई.ओ.आय.) मागविण्यात येत आहेत.

१. अभिव्यक्ती स्वारस्य फॉर्म वेबसाईट : http://mahatenders.gov.in/nicgep.app या वेबसाईट वर उपलब्ध आहेत.
२. अभिव्यक्ती स्वारस्य फॉर्मस् दिनांक २२.०५.२०२१ ते ३१.०५.२०२१
३. अभिव्यक्ती स्वारस्य स्विकृतीची दिनांक ३१.०५.२०२१ दु. ४.०० वाजेपर्यंत
४. शक्य असल्यास अभिव्यक्ती स्वारस्य दिनांक ०१.०६.२०२१ रोजी सायं ५.०० नंतर उघडण्यात येतील.
५. अभिव्यक्ती स्वारस्य फॉर्म्स पोस्टाद्वारे करण्यात येणार नाही.
६. अभिव्यक्ती स्वारस्य स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय, यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.
७. अभिव्यक्ती स्वारस्य भरून वेबसाईट : http://mahatenders.gov.in/nicgep.app या वेबसाईटवर अपलोड करण्यात यावे.
८. अभिव्यक्ती स्वारस्य सादर करण्यापूर्वी आपल्या फार्म व डिजिटल स्वाक्षरीची नोंदणी करिता Contact Helpline No. 18002337315 वर संपर्क साधण्यात यावा.

जाक्र. कडोंमपा/जसंवि/मुका/१६४
दि. २१/५/२१

सही/-
प्रभारी वैद्यकीय
आरोग्य अधिकारी
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

---

MUTUAL FUNDS Sahi Hai

**Indiabulls MUTUAL FUND**

**Investment Manager :** Indiabulls Asset Management Co. Ltd. (AMC)
**Registered Office:** Plot No. 448-451, Udyog Vihar, Phase-V, Gurgaon, Haryana - 122016.
**Tel:** (0124) - 6681199, **Fax:** (0124) - 6681111, **Website:** www.indiabullsamc.com
**CIN:** U65991HR2008PLC095063

**Notice cum Addendum No. 05/ 2021**

**Notice cum Addendum to the Scheme Information Document (SID), Key Information Memorandum (KIM) of all the below Schemes and Statement of Additional Information (SAI) of Indiabulls Mutual Fund (IBMF)**

I. **Change in Registered Office address of Indiabulls Asset Management Company Ltd. (Investment Manager of Indiabulls Mutual Fund):**

Kindly take a note of change in Registered Office address of Indiabulls Asset Management Company Limited (Investment Manager of Indiabulls Mutual Fund) with effect from May 10, 2021 (Monday).

| Old Address | New Address |
|---|---|
| M - 62 & 63, 1st Floor, Connaught Place, New Delhi - 110 001. Old CIN: U65991DL2008PLC176627 | Plot No. 448-451, Udyog Vihar, Phase-V, Gurgaon, Haryana - 122 016. New CIN: U65991HR2008PLC095063 |

II. **Cessation of the term of Mr. Girish Chandra Srivastava as an Independent Director of Indiabulls Asset Management Company Limited :**

Notice is hereby given that Pursuant to SEBI Circular no. SEBI/HO/IMD/DF2/CIR/P/2017/125 dated November 30, 2017, the term of Mr. Girish Chandra Srivastava as an Independent Director of Indiabulls Asset Management Company Limited has completed and he ceases to be the Independent Director of the Company with effect from closing business hours of May 17, 2021.

III. **Cessation of the term of Mr. Karumbur Vasudevan as an Independent Director of Indiabulls Trustee Company Limited :**

Notice is hereby given that Pursuant to SEBI Circular no. SEBI/HO/IMD/DF2/CIR/P/2017/125 dated November 30, 2017, the term of Mr. Karumbur Vasudevan as an Independent Director of Indiabulls Trustee Company Limited has completed and he ceases to be the Independent Director of the Company with effect from closing business hours of May 17, 2021.

**Note:** This Notice cum addendum forms an integral part of the SID, KIM of all the Schemes & SAI of IBMF. All other terms and conditions as mentioned in the SID, KIM of all the above mentioned Schemes & SAI shall remain unchanged.

As per the Go Green Initiative, investors are encouraged to register/update their email id and mobile number with us to support paper less communications.

**For Indiabulls Asset Management Co. Ltd.**
**(Investment Manager to Indiabulls Mutual Fund)**
Sd/-
**Uday Diwale**
Compliance Officer

Place : Mumbai
Date : May 21, 2021

**Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.**